# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 20/05/2020 (बुधवार)
(सायंकाळ)

### अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावर एसकेजी कंपनी एमआयडीसी बोरी येथे दिनांक 17/05/2020 चे 16.30 वा. दरम्यान रमेश नन्हेलाल प्रजापती(मृतक), वय 42 वर्ष, रा. वार्ड क्र. 6, बुटीबोरी हा एक वर्षापासून मजूर म्हणून कामाला होता. दि. 17/05/2020 चे 04:30 वा. दरम्यान तिथे हजर असलेल्या मजूरांना सांगून गेले की, मी पाणी पिवून येतो असे बोलून मृतक हा कंपनीच्या स्टीलच्या लोखंडी स्टीलच्या छतावरुन 26 फूटावरुन खाली जमीनीवर पडला. यात त्याच्या छातीवर, पोटावर, मार लागून जखमी झाल्याने त्यास उपचाराकामी दि. 09/05/2020 चे 09:00 वा. मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता त्यांचा मृत्यू झाला. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार बन्सोड, पो. स्टे. एमआयडीसी बोरी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार अशोक तरमळे 9923699185 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 13 कि. मी. अंतरावर मोहपा वार्ड क्र. 10 येथे दिनांक 13/05/2020 चे 21.30 वा. दरम्यान उर्मिला युवराज शिरसागर, वय 14 वर्ष, रा. वार्ड क्र. 10, मोहपा हि दिनांक 12/05/2020 ची शिळी खिचडी दि. 13/05/2020 रोजी खाल्यामूळे तिची प्रकृती अचानक खराब झाली. तिला उपचारकामी प्रथम पीएचसी मोहपा व नंतर मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता दि. 14/05/2020 रोजी 11:30 वा तिचा मृत्यू झाला. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार विकास बेलसरे, मेडीकल पोलिस बुथ नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार लक्ष्मण रूडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर